VOL- VI ISSUE-XI NOVEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# हाल्या हाल्या दुधू दे मधील ग्रामीण जीवन

डॉ.लहू दिगंबर वाघमारे
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव.

"हाल्या हाल्या दुधू दे" ही मराठी भाषेतील बहुचर्चित आणि सुपरिचित अशी ग्रामीण कादंबरी आहे.या कादंबरीचे लेखक बाबाराव मुसळे हे ग्रामीण जीवन मनस्वीपणे जगलेले सर्जनशील लेखक आहेत. "मोहरलेला चंद्र" "झिंगू लुखू लुखू " हे कथासंग्रह "पखाल" ,"वारूळ" ,"पाटीलकी" या कादंबऱ्या. तसेच "मृदंग" हा ललित लेखसंग्रह "कळप," "ठिणग्या" ,"प्रकाश ज्ञानबा काळे" आणि "एकली" या कादंबऱ्या आणि "काशी ते कन्याकुमारी "हे प्रवासवर्णन ही सर्व त्यांची आगामी प्रकाशने आहेत .हाल्या हाल्या दुधू दे ही त्यांची पहिलीच ग्रामीण कादंबरी असून त्यांच्या या विपुल साहित्य लेखनासाठी त्यांना महाराष्ट्र सरकारचे आणि इतर विविध मान्यवर संस्थांचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ग्रामीण जीवन प्रत्यक्ष स्वतः पचवून व ती जाणीव स्वतःत आत्मसात करून आपल्या साहित्यातून ती त्यांनी जिवंतपणे अविष्कृत केली आहे .त्यांच्या साहित्यातील जिवंत अनुभूतीमुळे व गुणवत्तेमुळे त्यांना विविध पुरस्काराबरोबरच त्यांची विविध साहित्य संमेलनाध्यक्षपदी निवड झाली आहे. तसेच त्यांच्या साहित्यावर पीएच.डी साठी अनेक संशोधक अभ्यासक संशोधन करीत आहेत यातूनच त्यांच्या साहित्याचे श्रेष्ठत्व सिद्ध होते .प्रस्तुत हाल्या हाल्या दुधू दे ही त्यांची कादंबरी विदर्भ आणि मराठवाड्यातील वर्तमानकालीन शेतकऱ्यांच्या आत्महत्या सत्राच्या पार्श्वभूमीवर प्रकाशित झालेली महत्त्वपूर्ण कादंबरी आहे 1985 साली पुण्याच्या मेहता पब्लिशिंग हाऊसने

डा. आनंद यादव आणि डा. द.दी. पुंडे यांच्या सहकार्याने तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी हा स्पर्धात्मक उपक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये सहभागी झालेल्या एकूण पन्नास लेखकांच्या ग्रामीण कादंबऱ्यांतून सर्वोत्तम म्हणून या कादंबरीची निवड करण्यात आली आहे .1985 ला ही कादंबरी प्रकाशित झाली आणि पुढील पंधसवीस वर्षांच्या कालखंडात शेतकऱ्यांच्या जीवनात जी परिस्थिती उद्‌भवली त्याचे भवितव्य या कादंबरीत आविष्कृत करण्यात आले आहे प्रस्तुत कादंबरी एकविसाव्या शतकातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र जे सुरू झाले ते मांडते वर्तमानकालीन शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भातही ही कादंबरी तंतोतंत लागू पडते. म्हणजेच या कादंबरीने शेतकरी जीवनाचे भाकित मांडले आहे .शेतकऱ्यांच्या भीषण वास्तवावर आधारलेली ही कादंबरी एकमेव ग्रामीण कादंबरी म्हणून प्रसिद्ध झाली आहे ग्रामीण लेखक म्हणून लेखकांनी आपल्या अवताल भोवतालच्या वातावरणातील फाटक्या तुटक्या आडाणी माणसांची सुखदु:खे राग,मोह ,मत्सर इत्यादी सारे चढ-उतार प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे खरे तर तिसऱ्या पिढीतील साहित्यिक दर्जेदार कादंबऱ्या देऊ शकले नाहीत.दर्जेदार ग्रामीण कादंबरीचा या पिढीमध्ये अभावच आहे याच पार्श्वभूमीवर या कादंबरीचे महत्व दृग्गोचर होते .लेखक बाबाराव मुसळे यांची ग्रामीण जीवन जाणीव समृद्ध अहे. म्हणून या कादंबरीतील जीवनानुभवही अस्सल झाला आहे साहित्य निर्मितीमागे जी गंभीर भूमिका असावी लागते ती बाबाराव मुसळे यांनी बजावली आहे साहित्यनिर्मिती हा हौसेचा भाग नसून तो व्रतासारखा निष्ठेने स्वीकारायचा भाग आहे .याची जाणीव बाबाराव मुसळे यांना पुरेपूरअसलेली दिसते .म्हणूनच ही कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणारी कादंबरी ठरली आहेतसेच ती ग्रामीण साहित्य व ग्रामीण साहित्य चळवळीला दिशादर्शक ठरणारी आहे. या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की तिच्यातून ग्रामीण अस्सल जीवनानुभव व्यक्त करण्यात आला

आहे यात घडणाऱ्या सर्व घटना या स्वाभाविक व नैसर्गिक स्वरूपाच्या घडताना दिसतात .या कादंबरीचे कथानक चित्तथरारक आहे. छोट्याशा संसारात रममाण झालेले ज्ञानबाआणि आनसा हेआपल्या सहा एकर जमिनीत कष्ट करून जगत असतात .त्यांची शोभा ही मुलगी वयात आलेली असते. आणि अचानक शोभाचा मामा रावसाहेब पाटील हा शोभासाठी सोयरीक आणतो. लग्न जमवतो. त्याचा त्यामागे खूप मोठा स्वार्थ असतो. शोभाची एक फुई सासू तिच्या मामाच्या गावात असते .ती शोभाच्या मामाची दूरची चुलत भावजयीचअसते .तिला मुलबाळ नसल्यामुळे तिची सर्व संपत्ती हडप करण्यासाठी रावसाहेब ज्ञानबाच्या मुलीचे लग्न जमवतो शोभाच्या सासऱ्याला हाताशी धरून त्याला हा स्वार्थ साधायचा असतो .शोभाच्या फुई सासूच्या वटीत शोभाचा मामेभाऊ देण्याचा त्याचा विचार असतो. त्यासाठी तो आपल्या स्वतःच्या भाचीच्या जीवनाशी खेळतो. ग्रामीण जीवनात अशा खलनायकी प्रवृतीची दुष्ट माणसे असतात त्याचे अत्यंत वास्तव व जिवंत चित्रण या कादंबरीतून व्यक्त झाले आहे तसेच ग्रामीण भागातील शेती शिवारासाठी चाललेला कावेबाजपणा याचेही चित्रण या कादंबरीतून आले आहे.शोभाचा सासरा पाशवी आणि अत्याचारी प्रवृत्तीचा असतो. तो आपल्या मुलाचे लग्न करतो आणि आपल्या सुनांवर बलात्काराचा प्रयत्न करतो हे सर्व गावाला माहिती आहे शोभाच्या मामाला हे माहिती आहे. तरीही जाणीवपूर्वक तो स्वार्थ साधण्यासाठी हे लग्न जमवतो एवढेच नाही तर न्यानबाकडून सावकाराला म्हणजेच आपल्या व्याह्याला शेकडा दहा रूपयेप्रमाणे व्याज घेण्यास सांगतो आणि त्या मोबदल्यात न्यानबाची तीन एकर जमीन लिहून घेतो. ती जमीन त्याला परत मिळणार नाही. यासाठी तो सावकार न्यानबावर अनेक संकटे आणतो. ठरल्यापेक्षा मोजणी करणा-या पांडेबुवाला पैसे देऊन न्यानबाची तीन एकरपेक्षा अधिक जमीन तो सावकार लिहून घेतो. त्याच्यासोबत अनेक वेळा भांडणे करून ती लिहून दिलेले जमीन बळकावण्याचा कसोशीने प्रयत्न करतो .शोभाच्या संसाराची जे व्हायचे ते वाटोळे करण्याचे कार्य तिच्या मामाकडून घडल्यामुळे तिच्या जीवनाची वाताहात होते. लग्नानंतर तिचा सासरा तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो.ती त्याचा प्रतिकार करते. तेव्हा तो तिला जाळून मारण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्यातूनही ती सहीसलामत बचावते. तेव्हा तिचा सासरा तिच्या चारित्र्यावर संशय घेतोतिच्या अब्रुचा तमाशा मांडतो मग ती माहेरीच जाऊन राहते. खरे तर तिच्या नवऱ्यालाही तिच्याबद्दल खूप सहानुभूती आहे व तिच्या मनातही आपल्या नवऱ्या बद्दल आत्मीयता आहे. परंतु तिचा सासरा आपल्या मुलाचा संसार उध्वस्त करतो. त्यामुळे शोभाचा नवरा आजारी पडतो. शोभासाठी झुरतो त्याला भेटण्यासाठी व त्याला आजारातून उठविण्यासाठी शोभा आपल्या ननंदेच्या गावी म्हणजेच देवगावला जायचा प्रयत्न करते. त्या गावच्या वर्शिलासोबत ती त्याला भेटण्याच्या ओढीने गाडीवर बसून जात असताना सावकार काही माणसा- करवी त्या दोघांनाही मारहाण करून त्यांची बदनामी करतो .त्यात हे दोघे गंभीर जखमी होतात .याबद्दल गावात खूप उलटसुलट चर्चा होतेहा धक्का सहन न झाल्याने शोभा झुरते आणि शेवटी आत्महत्या करते शोभा ही नायिका सोशिक आहे. आपल्यावर झालेल्या अन्यायाबद्दल ती आपल्या आई-वडिलांना बोलत नाही तिच्यावर होणारे आरोप-प्रत्यारोप ती सहन करीत राहते .आई-वडिलांना त्रास होऊ नये .याचा प्रयत्न करते .परंतु तिच्यासमोरचे सर्व मार्ग संपतात आणि तिची सहनशीलता ही संपते तेव्हा ती आपली जीवनयात्रा संपविते. सावकाराचा मुलगा प्रकाशला मारतो न्यानबाच्या गळ्यालाही कॅन्सरची गाठ होते. अशी एकामागून एक संकटे यायला लागतात. ती न पेलवल्यामुळे आणि कॅन्सरची गाठ मोठी झाल्यामुळे त्यात न्यानबाचा मृत्यू होतो आणि एक सुखी असलेले कुटुंब संपते अशी ही ग्रामीण भागातील एका संसार उध्वस्त झालेल्या कुटुंबाची समस्याग्रस्त वास्तव जीवन मांडणारी साधी सोपी भाषा असलेली कादंबरी आहे. लेखन करून बाबाराव मुसळे यांनी शेतकरी जीवनाचे अस्सल दर्शन येथे घडविले आहे.ही कथा बाबाराव मुसळे यांनी अत्यंत करूणपणे मांडल्यामुळे ती वाचनीय झाली आहे. ग्रामीण कादंबरी म्हणून जेव्हा या कादंबरीचा विचार केला जातो. तेव्हा ग्रामीण भागातील शेती व्यवसाय, खत- बी बियाणे ,वारंवार येणारा दुष्काळ ,अल्पभूधारक शेतकऱ्यांचे सावकाराकडून होणारे भरमसाठ शोषण, नात्यातल्या

VOL- VI ISSUE-XI NOVEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

माणसाकडून ग्रामीण माणसाचे झालेले जीवघेणे उध्वस्तपण, ग्रामीण भागातील सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ती, त्यांच्यात चाललेला संघर्ष. या एक नाही तर अशा अनेक घडामोडींचे अत्यंत वास्तव पूर्ण व करूण चित्रण बाबाराव मुसळे यांनी अत्यंत दाहकपणे या कादंबरीत मांडले आहे शंकर पाटला-सारखा नीतीमान प्रामाणिक व दुर्बलांच्या सोबत सदैव माणुसकीच्या नात्याने खंबीरपणे उभा राहणारा एक आदर्श नायक म्हणून शंकर पाटील त्यांनी जिवंतपणी उभा केला आहे .तसेच रावसाहेब पाटील ,सावकार शोभाचा सासरा, रखमी आणि तिचा दुष्ट नवरा इ. खलनायकी व्यक्तीसुद्धा या कादंबरीत करून जिवंतपणे व्यक्त झाल्या आहेतग्रामीण भागातील पोळा, नागपंचमी यात्रा,सण-उत्सव ,रूढी परंपरा, चालीरीती आणि समजुती या कादंबरीतून ज व्यक्त झाल्या आहेत. ग्रामीण भागातील विविध जनप्रवृत्ती काही प्रातिनिधिक व्यक्तिचित्रणातून बाबाराव मुसळे यांनी व्यक्त केल्या आहेत .शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि वारंवार येणारा दुष्काळ हा वर्तमानकालीन गहन विषय हाच या कादंबरीचा महत्त्वाचा विषय आहे .ग्रामीण भागातील नातेसंबंधातील ताणतणावांचे चित्रणही या कादंबरीतून आले आहे ग्रामजीवनातील अनेक समृद्ध अनुभव व त्या अनुभवाचे सर्व पैलू बाबाराव मुसळे यांनी अत्यंत संवेदनशीलतेने व तेवढ्याच सौंदर्यतेने व्यक्त केले आहेत. ग्रामजीवनातील ग्राम अनुभवाच्या ज्वलंत अभिव्यक्तीसाठी लेखका वापरलेली बोलीभाषा ही अत्यंत दाहक, सौंदर्यपूर्ण असल्यामुळे त्याला आशय अभिव्यक्ती सौंदर्य प्राप्त झाले आहे. प्रस्तुत कादंबरीच्या सर्व निवेदन संभाषणात त्यांनी वऱ्हाडी बोलीचा केलेला वापर हा अत्यंत औचित्यपूर्ण ठरला आहे या भाषा विशषामुळे या कादंबरीची ग्रामीणता वाढीस लागताना दिसते व तिचे मूल्यही वाढते. मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात प्रस्तुत कादंबरी मोलाची भर घालणारी ठरली आहे. एका शेतकऱ्याची झालेली पडझड ,त्यामुळे त्याच्या जीवनाची झालेली शोकांतिका चितारणारी ही कादंबरी ग्रामीण वास्तवाचा वेध व शोध घेण्यात यशस्वी ठरली आहे.

**संदर्भसूची :**

1) बाबाराव मुसळे ."हाल्या हाल्या दुधू दे'. बजाज पब्लिकेशन्स अमरावती तिसरी आवृत्ती. जुलै 2019
2) डॉ. रवींद्र ठाकूर मराठी "ग्रामीण कादंबरी".मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. प्रथमावृत्ती नोव्हेंबर 1993
3) डॉ.हरिश्चंद्र थोरात "कादंबरी एक वाडमयप्रकार शब्द पब्लिकेशन्स मुंबई.आवृत्ती पहिली .आगस्ट 2019
4) डॉ.रेखा जगदाळे. "प्रादेशिक ग्रामीण साहित्य" .विजय प्रकाशन नागपूर .प्रथमावृत्ती मार्च 2007.